नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २४/०३/२०२२ (गुरूवार)**

**(सायंकाळ)**

---

## कोंढळी येथुन वर्धा येथे अवैधरीत्या देशी–विदेशी दारुची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक २३/०३/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, ना.ग्रा चे पथक पो.स्टे. कोंढाळी हददीत पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम हे बाजार चौक कोंढाळी येथून कारंजा वर्धा करीता दारूचे अवैध वाहतुक करणार आहेत. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने कोंढाळी येथील उडाणपूला खालील रस्त्यावर नाकाबंदी करून बाजार चौकाकडून येणाऱ्या संशयीत मारोती ईको कारला थांबवून चेक केले असता कार मधील आरोपी नामे क्र. १) स्वप्नील पुंडलिकराव वानखेडे, वय २६ वर्ष, रा. कारंजा जि. वर्धा, २) किशोर धनराज सावरकर, वय २३ वर्ष, रा. कोंढाळी व ३) अन्ना व्यंकटीया (देशी दारू भटटी बाजार चौक, कोंढाळी व गाडीचे मालक) यांच्या कडुन विनापरवाना व अवैधरीत्या देशी दारू संतरी १८० एमएल चे ४८ निपाची १ पेटी प्रमाणे अश्या एकुण २६ पेट्या कि. १,२४,८००/–रू., देशी दारू संतरी ९० एमएल च्या १०० निप ची १ पेटी असा एकुण ३ पेटया कि. १५,०००/–रू., विदेशी दारू (टुयबर्ग स्टांग बियर) ६५० एमएच चे १२ नग ची १ पेटी असा एकुण ४ पेट्या कि. १४,४००/–रू. व मारूती ईको कार क्र. एमएच–४०/एआर–३३८२ कि. ६,००,०००/–रू. असा एकुण ७,५४,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. यातील आरोपी क्र. १ व २ ला अटक करण्यात आली आहे व क्र. ३ फरार आहे. पुढील कार्यवाही करीता आरोपीतांना पो.स्टे. कोंढाळी यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे सहायक पोलीस निरीक्षक श्री. अनिल राउत, स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीतांविरुध्द कलम ६५ (अ), ८३ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, श्री. सपोनि श्री अनिल राउत, पोलीस हवालदार राजेंद्र सनोडिया, नापोशि मयुर ढेकले, महेश बिसने, अमृत किंनगे, चालक पोहवा भाउराव खंडाते यांचे पथकाने केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर